
श्री ज्ञानेशो भगवान विष्णुः



अयाचित अजान वृक्षबन, पुसेसावळी ( सातारा )

रयत शिक्षण संस्थेचे,

" स्वावलंबी शिक्षण हेच आमचे ब्रीद " -कर्मवीर
स्थापना १९५४

# सद्गुरू गाडगे महाराज कॉलेज,


**कला, विज्ञान व वाणिज्य** (कनिष्ठ व वरिष्ठ)

**विद्यानगर,** कराड -पीन ४१५ १२४

जि. सातारा (महाराष्ट्र) पो. बॉ. नं. ३

दूरध्वनी कार्यालय : ७१३४६
निवास : ७१७९४

(शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर संलग्नित)

संस्थापक :
पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील डी. लिट.
प्राचार्य :- ई. जी. निकम M. A.


---

संदर्भ क्र.

दिनांक : २३/५/१९९८

## प्रमाणपत्र

श्रीमती चित्ररेखा हरिभाऊ कुलकर्णी ही या महाविद्यालयात सन १९९७-९८ या शैक्षणिक वर्षात एम. फिल ( मराठी ) पदवी अभ्यासक्रमासाठी नियमित विद्यार्थिनी होती. तिने नामदेवांच्या ज्ञानेश्वर चरित्राची प्रेरणा व स्वरूप या विषयावर डॉ. कन्हैया कुंदप यांच्या मार्गदर्शनाखाली प्रबंधिका पूर्ण केली आहे. तिची प्रबंधिका एम. फिल परीक्षेसाठी स्विकारावी अशी मी शिफारस करतो.

[ ई. जी. निकम ]
प्राचार्य,
स. गा. म. कॉलेज, कराड.

# प्रमाणपत्र

श्रीमती. चित्ररेखा हरिभाऊ कुलकर्णी यांनी "नामदेवांच्या ज्ञानेश्वर चरित्राची प्रेरणा व स्वरुप" या विषयावर माझ्या मार्गदर्शनाने ही प्रबंधिका त्यांनी स्वतःच पूर्ण केली आहे. ही प्रबंधिका विद्यापीठाच्या एम्.फिल्.पदवीसाठी सादर करण्यास मी अनुमती देत आहे. त्यांचे शोध प्रबंधिकेचे काम पूर्णावस्थेत आहे व तो सादर करण्यात काही अडथळा नाही. याची मला खात्री आहे.

मार्गदर्शक

प्रा.डॉ.क.बा.कुंदप
मराठी विभाग प्रमुख,
सद्‌गुरु गाडगे महाराज कॉलेज,
कराड - ४१५ ११०.

# प्रतिज्ञापत्र

"नामदेवांच्या ज्ञानेश्वर चरित्राची प्रेरणा व स्वरुप" या विषयावरील सदरची प्रबंधिका मी शिवाजी विद्यापीठाच्या एम्.फिल्.या पदवी परीक्षेसाठी लिहिली आहे. ही प्रबंधिका अथवा यातील कोणताही भाग मी अन्यत्र कोणत्याही परीक्षेसाठी सादर केलेला नाही.

स्थळ :- कराड

अभ्यासक

दिनांक:- ८।६।९८

श्रीमती चित्ररेखा हरिभाऊ कुलकर्णी

# आदरांजली

शब्दांची जुळवूनी गुंफण
तवसप्तशताब्दि कारण
प्रबंधिकेचा रचून शेला
पांघरिला तव समाधि स्थला
आदरांजली ही प्रबंधिकेची
अर्पितसे मी तवसप्तशताब्दि

# आशिर्वाद

ज्ञानेश्वर सप्तशताब्दि काळ
"नामदेवकृत ज्ञानेश्वर चरित्र" माळ
जुळवुनी शब्दांचा मेळ
अर्पूनिया तव पदस्पर्शास्तव
ज्ञानेशा ! आशिर्वादासह स्फूर्ती दे

लेखणी त्वा धरोनिया हाती
"नामदेवा गाथा" अभ्यासिता
ज्ञानशा तव चरित्र लिहिता
पूर्ती करोनि घेई आता

गुरु 'कन्हैया' साक्षात श्रीकृष्णची समर्थ
विषय आवडे मनापासोनि परमार्थ
ग्रंथालयीन, ग्रंथविषयक साधनांची साथ
करता करवोनि घेता मार्गदर्शक यथार्थ

झाले ज्ञानाचे सार्थक
प्रबंधिका झाली सफल
सप्तशताब्दि स्तव - एक मागणे
ज्ञानेशा ! आशिर्वादासह स्फूती दे.

# पुरस्कार

"नामा म्हणे ग्रंथ श्रेष्ठ ज्ञानदेवी
एकतरी ओवी अनुभवावी"

महात्म्यांच्या जन्मशताब्दि आपण वेळोवेळी साजऱ्या करतो त्या पुण्य पुरुषांविषयीची कृतज्ञता व्यक्त करावी आणि त्यांच्या कार्यापासून प्रेरणा मिळावी अशा भूमिकेतून होणारे पुण्यस्मरण, संस्मरण समुचित असते. कोणत्याही ग्रंथाला सप्तशताब्दिचे भाग्य लाभले नाही. ज्ञानेश्वरीची सप्तशताब्दि लक्षावधी लोकांनी तर साजरी केलीच केली पण यावर्षी लोकांनी ज्ञानेश्वरांच्या समाधीची सप्तशताब्दि अगदी उत्साहाने साजरी केली.

परब्रह्मासमान, अक्षरब्रह्मासमान असणा-या ॐ नमोजि तत्व स्वरुप ज्ञानदेवांच्या चैतन्यमुर्तीस भावभक्ती पूर्ण अभिवादन

"नामदेवकृत ज्ञानेश्वर चरित्र" ही प्रबंधिका वाचकांच्या हाती देताना मला आनंद होत आहे. महाराष्ट्रातील संस्कृतीचा मानदंड असणा-या ज्ञानदेवांना व त्यांच्या वाङ्:मयाचे अभ्यासक संतनामदेवांना ज्ञानेश्वर सप्तशताब्दि महोत्सवा निमित्ताने ही माझी प्रबंधिका रुपी आदरांजली.

ज्ञानेश्वर सप्तशताब्दि सोहळा
योगायोग आगळा वेगळा
आदि, तिर्थावळी व समाधि
नामयाने रचिली गाथी
म्या पामरेने अभ्यासली
प्रबंधिका रुपी

# अनुक्रमणिका


| अ.क्र. | तपशील | पृष्ठांक |
|---|---|---|
| प्रकरण १ ले | भूमिका | ००१ |
| | प्रास्ताविक | ००४ |
| | १३ व्या शतकातील लेखक मनाने स्वीकारलेल्या जाणिवांचे स्वरुप | ००५-०२२ |
| | पूर्व संस्कारांचे स्वरुप | |
| | मराठी ग्रंथकारांसमोर असणारे लेखनादर्श व संस्कार | |
| | सामाजिक व राजकीय परिस्थिती | |
| प्रकरण २ रे | १३ व्या शतकातील लेखनाच्या प्रेरणा व चरित्रात्मक लेखनाचे स्वरुप | ०२३-०३९ |
| | नामदेवांच्या ज्ञानेश्वर चरित्राची प्रेरणा व स्वरुप | |
| | ज्ञानदेवकालीन महाराष्ट्र | |
| | संत नामदेवांचे व्यक्तिमत्व, नामदेव अल्पसे चरित्र परिचय | |
| | ज्ञानेश्वरांची दोन जुनी चरित्रे | |
| प्रकरण ३ रे | नामदेवांच्या लेखनाला प्रेरक ठरलेली तत्वे | ०४०-०९६ |
| | नामदेवकृत ज्ञानेश्वर चरित्र - | |
| | आदि - तिर्थावळी - समाधि | |
| | नामदेवांची नवविधा भक्ति | |
| प्रकरण ४ थे | नामदेवांच्या ज्ञानेश्वर चरित्राचे विशेष | ०९७-१३० |
| | नामदेवांचे कवित्व - काव्याचे स्वरुप, | |
| | काव्य प्रकार, काव्य गुण | |
| | नामदेवांचे तत्व चिंतन | |
| प्रकरण ५ वे | उपसंहार | १३१-१३५ |
| | परिशिष्ठे - आदि - तिर्थावळी - समाधि | १३६-१३७ |
| | संदर्भ ग्रंथ सूची | १३८ |

# भूमिका

"नामदेवांच्या ज्ञानेश्वर चरित्राची प्रेरणा व स्वरुप" हा विषय एम्.फिल.च्या प्रबंधिकेसाठी निवडण्यात आला तो मार्गदर्शक डॉ.कन्हैया कुंदप यांच्याशी सल्ला मसलत करुनच वारकरी संप्रदायाचे जे अप्रतिम धर्ममंदिर महाराष्ट्रात उभारण्यात आले. त्याचा विस्तार ज्ञानदेवांचे किंकरत्व स्विकारलेल्या नामदेवांनी केला, असे संत बहिणाबाईनी आपल्या एका सर्वश्रुत अभंगात म्हटले आहे. ज्ञानेश्वर, नामदेव, एकनाथ व तुकाराम या संत चतुष्काने वारकरी संप्रदायाचे प्रवर्तन केले. या चार संतकवींपैकी ज्ञानेश्वर, एकनाथ व तुकाराम यांचे व्यक्तित्व, काव्य आणि कार्य यासंबंधी आजवर अनेक अभ्यासकांनी भरपूर चिकित्सा केली आहे. त्यांच्या जीवनचरित्रांचा आणि कार्य कर्तृत्वाचा सर्वांगीण परामर्श घेणारे ग्रंथ वेळोवेळी प्रसिध्द झाले आहेत. त्या मानाने नामदेवांच्या ज्ञानेश्वरचरित्राचे स्वरुपावर व्यवस्थित अभ्यास अजुन झालेला दिसत नाही. तथापि ज्ञानेश्वरचरित्राची निर्मितीची प्रकिया शोधून,त्याचे स्वरुप समजावून घेऊन,नामदेवांच्या ज्ञानेश्वरचरित्र लेखनाच्या प्रेरणांचा अभ्यास करुन तो अभ्यासकांपुढे मांडण्याचा हा एक छोटासा प्रयत्न.

संत ज्ञानदेवांचे मित्र संत नामदेव यांच्याकडे विद्धज्जनांचे पाहिजे तितके लक्ष आतापर्यत गेले नव्हते. सत्ता, संपत्ती, कीर्ती यांच्याकडे पाठ फिरवून सुंभाचा करगोटा व रकटयाची लंगोटी लावून ईश्वरसंकीर्तनाच्या रंगांत नाचणा-या आणि ज्ञानदीप उजळणा-या या नम्र भगवभ्द्क्ताकडे आतापर्यत प्राय: दुर्लक्ष झाले होते. ज्ञानेश्वरांच्या चरित्राची आणि त्यांच्या संजीवन समाधीची माहिती याच भगवभ्दक्ताने आपल्याला दिली.

प्रस्तुत प्रबंधिकेत नामदेवांच्या ज्ञानेश्वर चरित्राचे स्वरुप व प्रेरणा स्पष्ट केल्या आहेत. नामदेवांनी ज्ञानेश्वरांचे चरित्र पददयातून मांडले आहे. आदि,तीर्थावळी आणि समाधि असे भाग करुन त्यामधून आपल्यापुढे ज्ञानेश्वर उभे करण्याचा प्रयत्न केला आहे.

साधी, सोपी समजणारी जनसामान्यांची भाषा आणि त्यावर कवित्वाचा

डौल चढवून आपले वेगळेपण जाणवून दिले आहे. नामदेवांची मांडणी,त्यांची तपशिलाने वर्णने, स्वतःच्या अनुभवावर आधारीत ज्ञानेश्वरांबद्दलचे आत्मोद्गार यामुळे हे चरित्र अत्यंत रसाळ झाले आहे. 'तीर्थावळी आणि समाधि' या प्रकरणामधील अभंग अभ्यासताना खरोखरीच आपण त्या त्या प्रसंगांचे प्रत्यक्ष अनुभव घेत आहोत असाच प्रत्यय येतो.

नामदेवांच्या ओघवत्या कवित्वाने त्यांचे वाङ्‌मय आपले वेगळेपण दाखविते आणि म्हणूनच एक महान चरित्रकार म्हणूनच आपणाला त्यांच्या काव्यरचना अभ्यासनीय वाटतात.

निखळ संशोधनाच्या भूमिकेतून ज्ञानदेव नामदेवांच्या व्यक्तिमत्वाला प्रणाम करण्यासाठी,त्यांची सेवा,भक्ती अल्पशी का होईना आपल्या हातून व्हावी या हेतूनेच 'नामदेवकृत ज्ञानेश्वर चरित्र' अभ्यासावे वाटले. आवडीचा विषय, तेही त्यांची सप्तशताब्दि साजरी होत असतानाच मिळाला. पूर्वजन्माचे सुकृतच म्हणायचे. मुळात सुंदर विषय आवडीचा आणि मार्गदर्शकांच्या मार्गदर्शनाने सजलेला हाही एक योगायोगच. प्रस्तुत अभ्यास विषयाची निवड करण्यापासून प्रबंधिकेला पूर्णत्व प्राप्त करुन देण्यापर्यंत माझे माननीय व आदरणीय मार्गदर्शक डॉ.कन्हैया कुंदप, प्रपाठक व मराठी विभाग प्रमुख, सद्गुरु गाडगे महाराज कॉलेज,कराड यांनी जे बहुमोल मार्गदर्शन व स्वत: कष्ट घेवून चांगले सहकार्य केले तसेच वेळोवेळी प्रबंधिका पूर्ततेसाठी प्रेरणा देण्यानेच ही प्रबंधिका पूर्णत्वापर्यंत पोहोचली. म्हणून प्रथम त्यांचे आभार मानण्यात आद्य कर्तव्य होय.

एम्.फिल.अभ्यासक्रमाला प्रवेश घेऊन तो पूर्ण करण्यासाठी सहकार्य व प्रेरणा देणारे सन्माननीय प्राचार्य श्री.ई.जी.निकम सद्गुरु गाडगे महाराज कॉलेज,कराड यांची मी ऋणी आहे. तसेच प्रा.श्रीमती.सुमनताई पाटील,प्रा.सौ. सूर्यमाला जाधव, प्रा.श्री.बी.पी.पाटील, प्रा.सौ.सरला निकम व प्रा.सौ.शोभना रैनाक यांचे सुयोग्य सहकार्य मिळाल्याबद्दल त्यांचीही मी आभारी आहे.

प्रबंधिकेसाठी आवश्यक महत्वाची अशी संदर्भ पुस्तके मिळवून देण्यासाठी,

सदगुरु गाडगे महाराज कॉलेज,कराड नगरपरिषद कराडचे ग्रंथालय, महिला महाविद्यालय कराडचे ग्रंथालय व त्या त्या ग्रंथालयाच्या ग्रंथपालांचे व त्यांच्या सहका-यांचे मी मन:पूर्वक आभार मानते.

तसेच प्रबंधिका पूर्णत्वाप्रत पोहोचवण्यासाठीचे अनमोल सहकार्य माझ्या यजमानांनी श्री.सुनील कुलकर्णी यांनी केले त्याबद्दल मी त्यांची ऋणी आहे. तसेच माझ्या कन्या कु.सायली व कु.श्रुती यांचेही आभार. तसेच प्रबंधिका वेळेत टंकलिखित करुन दिल्याबद्दल एस्.एस्.कॉम्पूटरर्स, ६,बनवडी कॉलनी, कराड यांचेही आभार.

# प्रास्ताविक

भारतीय जीवनात संत महात्म्यांनी केलेले कार्य फार मोलाचे आहे. त्यामुळे त्यांचे आपल्या समाज इतिहासातील स्थान अलौकिकच आहे. महाराष्ट्र समाज जीवनात तर संत ज्ञानदेव,नामदेव, एकनाथ, तुकाराम व रामदास या पाच संतकवींचे कार्य अद्वितीय असेच आहे. आज शतकानुशतके हया संतांची अमृतवाणी महाराष्ट्रीय मनाला संजीवनी देत आली आहे. हे पाच संत म्हणजे महाराष्ट्र जीवनाचे पंचप्राण होत. महाराष्ट्रात हया संतांचे वाङ्:मय आवडीने वाचले जाते. जेथे हया संतपंचकांचा प्रवेश झाला नाही ते महाराष्ट्रीय घरच नव्हे.

प्राचीन मराठी वाङ्:मयाच्या अभ्यासात अभ्यासकांनी बराच रस घेऊन संशोधन केलेले दिसते, तरीही "नामदेवकृत ज्ञानेश्वर चरित्राचा" व्यवस्थित अभ्यास अजून झालेला दिसत नाही. संतश्रेष्ठ ज्ञानेश्वरांचे अदयावत चरित्र आजपर्यंत लिहिले गेलेले दिसत नाही. तथापि ज्ञानेश्वर चरित्र हा वारकरी संप्रदायाचा आदय, चरित्रग्रंथ होय. त्याच्या निर्मितीची प्रकिया शोधणे हा नामदेवांच्या श्री ज्ञानेश्वर चरित्राचा मुख्य हेतू आहे.

ज्ञानेश्वरांच्या अलौकिक जीवनपेक्षा त्यांच्या चिंतनिकेला विशेष महत्व आहे. नामदेवांवर ज्ञानेश्वरांच्या तत्वज्ञानाचा आणि व्यक्तिमत्वाचा विशेष प्रभाव दिसतो. नामदेवांनी ज्ञानेश्वरांना जाणून घेण्यासाठी त्यांचे तत्वज्ञान समजून घेण्यासाठी ज्ञानेश्वर चरित्र लिहिले आहे. म्हणून पदय परंपरेत आदय चरित्रकार म्हणून नामदेवांचे नाव घेतले जाते. प्राचीन चरित्रात्मक लेखनाला भक्तीमार्गातील तत्वे कशी प्रेरक ठरली आहेत हे नामदेवांच्या ज्ञानेश्वर चरित्रातून अभ्यासण्यासारखे आहे. म्हणून नामदेवकृत ज्ञानेश्वर चरित्राचा अभ्यास हा विषय महत्वाचा ठरतो आणि याचाच उहापोह करण्याचा प्रयत्न प्रस्तुत प्रबंधिकेमध्ये केला आहे.

प्रकरण १ ले

१३ व्या शतकातील लेखक मनाने
स्वीकारलेल्या जाणीवांचे स्वरुप

पृष्ठ कमांक ००५ - ०२२